देशदूत
नवी आशा नवी दिशा
वर्ष ४४ । अंक २४५ । गुरुवार, दि. १५ मे २०१४ । पाने १४ किंमत ₹ ४

# डॉ. माशेलकरांना 'प्राईड ऑफ महाराष्ट्र'

सातपूर । दि. १४ प्रतिनिधी

अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी करप्रणाली आणि चालू वित्तीय तूट कमी करणे या बाबींवर प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे तरच देशाची अर्थव्यवस्था ७ ते ७.५ टक्क्यांपर्यंत पोहोचेल असे मत केंद्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांनी केले.

'भारतीय अर्थव्यवस्था आव्हाने आणि संधी' या विषयावर महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशन आणि एसएमई चेंबर ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या इंडिया इकॉनॉमिक आऊटलुक या परीषदेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांना महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशन आणि एसएमई चेंबर ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांच्या हस्ते 'प्राईड ऑफ महाराष्ट्र' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले; तसेच डॉ. माशेलकर यांना पद्मविभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल अहलुवालिया आणि अणू ऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.




यावेळी महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे, एल अँड टी, फायनान्स होल्डिंग प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक वाय.एम. देवस्थळी, भारत फोर्ज लिमिटेडचे संचालक पी. एच. रविकुमार, झायकॉम अध्यक्ष मनोहर बिडये, कॉस्मॉस बँकेचे कार्यकारी संचालक पी. एस. रावत, कॉम्प्रिहान्स इंडिया प्रा. लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी रॉबिन बॅनर्जी, भारतीय आयात निर्यात बँक माजी कार्यकारी संचालक प्रभाकर दलाल आदींसह मान्यवर उपस्थित होते.